**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**
VOL- VII ISSUE- VIII AUGUST 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# अमरावती व नागपूर परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना शारीरिक शिक्षण विषय शिकवितांना येणा—या अडचनीचे तुलनात्मक अध्ययन

**अजय प्र. कोलारकर**
हनुमान व्यायाम शाळा क्रीडा मंडळ,
शारिरीक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळ (महाराष्ट्र)

भारतात इंग्रज येण्यापूर्वी इ.स. १८१८ पासून विद्यार्थ्यांना शाळांमधून शिक्षण दिले जात होते. परंतू यांच्या अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षणाला विशेष स्थान दिले नव्हते. ज्या काही शैक्षणिक संस्था होत्या त्या सर्व संस्थामधुन शारीरिक शिक्षण देण्याची व्यवस्था त्या त्या संस्था प्रमुखाच्या मर्जीवर होती. १८८१ मध्ये काही महाविद्यालयांनी स्वयंस्फुर्तीने खेळ सुरू केले. अशा प्रकारे मेकॉले यांच्या प्रणालीनुसार शिक्षणाची व्यवस्था सर्वस्वी सफल झाली. इ.स. १८८२ मध्ये 'इंडीयन एज्युकेशन कमिशनने' देशी खेळांना उत्तेजन देऊन मैदानी व्यायामप्रकार, कवायत इत्यादी शाळांच्या सोईप्रमाणे सुरू करावेत, असा अहवाल शासनास सादर केला होता. यानुसार खेळ, व्यायाम, काही हालचाली पद्धतीच्या कवायतींचे शिक्षण शाळेतून देण्याकरिता व शारीरिक शिक्षकांना प्रशिक्षण देण्याकरिता मुंबई येथे एक व्यायाम शाळा उघडण्यात आली होती. त्यामुळे काही निवडक शाळांतून शारीरिक शिक्षण हा ऐच्छिक विषय म्हणून या विषयास सुरूवात झाली१९२२ मध्ये भारतीय शिक्षण आयोगाने शारीरिक शिक्षणास मान्यता दिली व शालेय अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षणास ऐच्छिक स्वरुपाचे स्थान प्राप्त झाले. १९२० मध्ये 'इंडीयन ऑलिम्पिक असोसिएशन' ची स्थापना झाली.स्वातंत्र्या नंतर भारतीय शिक्षण पध्दतीत व शारीरिक शिक्षण पध्दतीत आमुलाग्र बदल करण्यात आला. ब्रिटिश काळात शिक्षणाचे ध्येय 'नोकरशाही वर्ग निर्माण करणे' हा होता. स्वातंत्र्या नंतर यामध्ये बदल करण्यात आला. शिक्षणाने व शारीरिक शिक्षणाने व्यक्तीचा बौध्दिक, मानसिक, शारीरिक व सामाजिक विकास साधला पाहिजे व ती व्यक्ती 'आदर्श नागरिक' बनली पाहिजे हे ध्येय निश्चित करण्यात आले. शारीरिक शिक्षणास शिक्षणाचा अविभाज्य घटक मानण्यात आले. प्राथमिक ते महाविद्यालयीन शिक्षणात शारीरिक शिक्षणास स्थान प्राप्त झाले. महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षणाची परंपरा थोर आहे. या परंपरेची जोपासना करुन ते वाढविण्याचे श्रेय महाराष्ट्रातील खाजगी संस्थानाच जाते. महाराष्ट्रातील शाळा व महाविद्यालयात शारीरिक शिक्षणाचे स्थान हे मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांच्या शारीरिक शिक्षणा बद्दल असलेल्या आस्थेवरच या विषयाचे भवितव्य अवलंबून होते. १८६६ मध्ये सरकारी पातळीवर शारीरिक शिक्षणाच्या धोरणात्मक विचार 'मिस कारपेन्टर' नावाच्या एका शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्त्यांच्या सूचनेवरुन प्रथम मांडण्यात आला होता. त्यामुळेच शाळेत कवायती, कसरतीचे व्यायाम इ. शारीरिक शिक्षण देण्यास सुरूवात झाली. शिक्षणाधिकाऱ्यांनी पर्यवेक्षकांच्या अहवालात शारीरिक शिक्षणावरही अभिप्राय देण्याबाबत आदेश निर्देशीत केले.

**समस्येचे उद्देश:**

अध्यापक विद्यालयाच्या अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षण या विषयाचा विशेष समावेश करुन त्या अनुषंगाने झालेल्या बदलामुळे

शारीरिक शिक्षण शिक्षकांना शारीरिक शिक्षण हा विषय शिकवितांना उद्‌भविणाऱ्या अडचणींना पडताळून पाहण्याचा मुख्य उद्देश होता.

अमरावती व नागपूर परिक्षेत्रातील शारीरिक शिक्षण शिक्षकांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

अमरावती व नागपूर परिक्षेत्रातील शारीरिक शिक्षण शिक्षकांना येणाऱ्या अडचणींची तुलना करणे.

ग्रामीण व शहरी विभागामध्ये असलेल्या अपूऱ्या सुविधां नुसार विषय शिकवितांना येत असलेल्या अडचणींचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना:**

संशोधनकर्त्याने अशी परिकल्पना केली होती की,

१ अमरावती परिक्षेत्रामधील अध्यापक विद्यालयातील शारीरिक शिक्षण शिक्षकांना शारीरिक शिक्षण विषय शिकवितांना येत असलेल्या अडचणी ह्या नागपुर परिक्षेत्रातील शिक्षकांना देखील सारख्याच असतील.

२ शारीरिक शिक्षण हा विषय शिकवितांना येणाऱ्या अडचणी शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात जास्त आढळतील.

**संशोधनाची कार्यपद्धती**

**३.२ जनसंख्या —**

प्रस्तुत संशोधनाकरिता अमरावती व नागपूर परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयातील कार्यरत शारीरिक शिक्षण शिक्षक हे माहितीचे स्त्रोत बनले.

**३.३ संशोधन अभिकल्प —**

प्रस्तुत संशोधनाकरिता सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**३.४ नमूना पद्धत —**

वर्तमान संशोधनासाठी अमरावती व नागपूर परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयातील कार्यरत शारीरिक शिक्षण शिक्षक यांची निवड यादृच्छिक पद्धतिने केल्या गेली.

**३.५ संशोधन कार्यवाही —**

प्रस्तुत संशोधनाच्या अध्ययनाकरीता प्रश्नावली, तसेच वैयक्तीक मुलाखातींचा उपयोग केल्या गेला. यामध्ये अमरावती परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयातील कार्यरत शारीरिक शिक्षण शिक्षकांचा व नागपूर परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयातील कार्यरत शारीरिक शिक्षण शिक्षकांचा समावेश करण्यात आला यांच्या तर्फे त्यांच्या विद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षणाच्या अडचणी, अडथळे, सोई—सुविधांची प्रश्नावली द्वारे माहिती गोळा करण्यात आली. खालील सारणीमध्ये असे स्पष्ट केले आहे की, अमरावती व नागपूर परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयातील शिक्षकांची यादी ही त्या जिल्ह्यातील तालुका विभागात असलेल्या विद्यालयाच्या संबंधीत शिक्षकांना भेट घेउन तयार करण्यात आली आहे

**३.८ साख्यिकीय कार्य पद्धती —**

संख्यिकीय विश्लेषणासाठी संशोधकाने निरीक्षणे आणि प्रतिसादाचे वर्णन करणारी टक्केवारी (Percentage) आणि Chi-Square पद्धत वापरली आहे.

**सारणी क्र. ०१**

**अमरावती व नागपूर परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयात विविध खेळांसाठी स्वतंत्र क्रीडांगणाच्या उपलब्धतेची टक्केवारी व काय—स्क्वेअर नुसार मूल्ये दर्शवणारी सारणी**

| परिक्षेत्र | होय | टक्केवारी | नाही | टक्केवारी | Chi Square ($\chi^2$) |
|---|---|---|---|---|---|
| **अमरावती क्षेत्र** | 5 | 17.86% | 23 | 82.14% | **11.571*** |
| **नागपूर क्षेत्र** | 7 | 25.00% | 21 | 75.00% | **7.000*** |
| **अमरावती शहरी** | 3 | 21.43% | 11 | 78.57% | **4.571*** |
| **नागपूर शहरी** | 4 | 28.57% | 10 | 71.43% | **2.571@** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अमरावती ग्रामीण** | 2 | 14.29% | 12 | 85.71% | **7.143*** |
| **नागपूर ग्रामीण** | 3 | 21.43% | 11 | 78.57% | **4.571*** |
| **शहरी क्षेत्र** | 7 | 25.00% | 21 | 75.00% | **7.000*** |
| **ग्रामीण क्षेत्र** | **5** | **17.86%** | **23** | **82.14%** | **11.571*** |

’सार्थक स्तर व /असार्थक स्तर

Tab $\chi^2_{0.05(1)} = 3.841$


उपरोक्त सारणी क्र.४.३५ प्रकट करते की, अमरावती व नागपूर परिक्षेत्रांची ($\chi^2$) प्राप्त मूल्ये अनुक्रमे ११.५७१ व ७.००० आहेत. तसेच दोन्ही परिक्षेत्रातील दोन्ही शहरी क्षेत्राची ($\chi^2$) प्राप्त मूल्ये अनुक्रमे ४.५७१ व २.५७१ आहेत. त्याचप्रमाणे दोन्ही परिक्षेत्रातील दोन्ही ग्रामीण क्षेत्राची ($\chi^2$) प्राप्त मूल्ये अनुक्रमे ७.१४३ व ४.५७१ आहेत. नागपूर शहरी क्षेत्र सोडले तर इतर सर्व मूल्ये सारणीबद्ध–मूल्य (1) सार्थकता स्तर 0.05 चे मूल्य (३.८४१) पेक्षा जास्त आहे. अर्थात, प्राप्त–मूल्ये सारणीबद्ध–मूल्य (1) सार्थकता स्तर 0.05 वर जास्त असल्याने सकारात्मक सार्थकतेची बाब निदर्शनास आणून देते.

तसेच अमरावती–नागपूर शहरी क्षेत्राचे $\chi^2$ प्राप्त मूल्य ७.००० आणि अमरावती–नागपूर ग्रामिण क्षेत्राचे $\chi^2$ प्राप्त मूल्य ११.५७१ हे सारणीबद्ध–मूल्य (1) सार्थकता स्तर 0.05 चे मूल्य (३.८४१) पेक्षा जास्त आहे. शहरी व ग्रामिण परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयात विविध खेळांसाठी स्वतंत्र क्रीडांगण कमी आहेत. तसेच शहरी क्षेत्रापेक्षा ग्रामिण क्षेत्रातील अध्यापक विद्यालयात खेळांसाठी स्वतंत्र क्रीडांगण प्रमाण फारच कमी असल्याने नकारात्मक सार्थकता आढळली.

दोन्ही परिक्षेत्राची ($\chi^2$) मूल्यावर तुलना केल्याने असे आढळून आले की, खेळांसाठी स्वतंत्र क्रीडांगण उपलब्ध करुन देण्याच्या अडचणींच्या बाबी अमरावती व नागपूर या दोन्ही परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयात सारख्याच आहे. **तेव्हा, पहिली परिकल्पना सिद्ध होते.**

तसेच ग्रामीण व शहरी क्षेत्राची ($\chi^2$) मूल्यावर तुलना केल्याने असे दिसून आले की, अध्यापक विद्यालयात खेळांसाठी स्वतंत्र क्रीडांगण उपलब्धतेच्या समस्येचे प्रमाण ग्रामीण व शहरी या दोन्ही क्षेत्रात समान स्तरावर आहे. तेव्हा, **दुसरी परिकल्पना सिद्ध होते.**

सारणी क्र.४.३५ मध्ये जे दर्शविल्या गेले आहे तेच, आलेख क्र.३३ मध्ये देखील ग्राफिकदृष्ट्या चित्रित केले आहे ते खाली दिले आहे.




अमरावती आणि नागपूर परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयात विविध खेळांसाठी स्वतंत्र क्रीडांगणाच्या उपलब्धतेची तुलनात्मक टक्केवारी दर्शविणारा आलेख.

**निष्कर्ष:** दोन्ही परीक्षेत्रातील अडचणी सारख्याच असून अडचणीचे प्रमाण देखील जवळपास सारखेच आहेत. तसेच जेव्हा अमरावती व नागपूर क्षेत्रातील शहरी आणि ग्रामीण भागांचा

विचार झाला तेव्हा दोन्ही क्षेत्रातील अडचणींच्या प्रमाणात तफावत दिसली.

## संदर्भ ग्रंथ सुची


1. अनिल फेंडर, “संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील अभियांत्रिकी महाविद्यालयात शारीरिक शिक्षण कार्यक्रम राबवितांना येणाऱ्या अडचणींचे अध्ययन”, (अप्रकाशित लघुशोध प्रबंध, संत गाडगे बाबा अमरावती तत्वज्ञान पारंगत पदवि करिता सादर, २००८).
2. सच्चिदानंद भिका जाधव, “अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरीय स्पर्धेतील कुस्ती खेळाडू आणि विद्यापीठाच्या सहभागाचा व प्राविण्याचा विश्लेषणात्मक अभ्यास”, (अप्रकाशित संशोधन प्रबंध, पुणे विद्यापीठ २००८).
3. Nate McCaughtry, Sara Barnard, Jeffrey Martin and Pamela Hodges Kulinna, “Teachers’ perspectives on the challenges of teaching physical education in urban schools: The student emotional filter”, Research quarterly for exercise and sport, Vol. 77, No. 4, (January 2007), pp. 486-497
4. Ismael Sood Al-Oun, Muder Qahtan Hameed, Al- Leheeby, “Obstacles facing the implementation of physical education curriculum in Iraqi Public Schools as perceived by Teachers in Anbar Governorate”, European Scientific Journal, Vol.11, No.16, (June 2015 edition), ISSN: 1857 – 7881
5. Cariaga, Jane N. “The Physical Education Program of State Universities in Isabela”, An Assessment Research Journal of Physical Education Sciences, Vol. 2(10), 1-8, October (2014).
6. Praveen Kumar et al., “Present status of infrastructure facility and sports policy in Sikh charitable schools in promotion of sports”, International Journal of Physical Education, Health and Social Science, ISSN: 2278-716X, Vol. 3, Issue 2, July, 2014.
7. Xihe Zhu, Catherine D. Ennis & Ang Chen, “Implementation challenges for a constructivist physical education curriculum”, Journal of Physical Education and Sport Pedagogy, Vol. 16, Issue 1, (2011) , pp.1531-1536.
8. Kate Jenkinson and Amanda C Benson, “Barriers to providing physical education and physical activity in Victorian State secondary schools”, **Article** in Australian Journal of Teacher Education, Vol. 35, Issue 8, (Dec 2010).